सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४० • सोमवार दि.२२ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## ‘त्या’६ खासदारांचा शिंदे सेनेत प्रवेश

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या ऑपरेशन टायगरला अखेर यश आल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. ठाकरे गटातील सहा खासदार आज दुपारी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. यासाठी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

संजय जाधव, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील आणि भाऊसाहेब वाकचौरे हे सहा खासदार शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा असून, या घडामोडीमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

# विधान परिषद निवडणुकीत अमरनाथ राजूरकर यांची विजयाची हॅट्रीक

## काँग्रेस,वंचितची मते फुटली;२३ मते अवैध




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघातून भाजप व महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी हॅट्रीक साधत दणदणीत विजय मिळविला आहे. त्यांनी उबाठा सेनेचे कृष्णा पाटील आष्टीकर यांचा पराभव केला. या निवडणुकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीची मते फुटली असून २३ मते बाद झाली आहेत. एमआयएमची मते कोणाला मिळाली याची जोरदार चर्चा स्थानिक राजकीय क्षेत्रात जोरदार चालू आहे.

नांदेड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी दि.१८ जून रोजी मतदान घेण्यात आले होते. या निवडणुकीत भाजप व महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर, उबाठा सेना व महाविकास आघाडीचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर व वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले हे निवडणूक रिंगणात होते. मतदानाच्या दोन दिवसापूर्वी कृष्णा पाटील आष्टीकर यांचे वडील खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी उबाठा सेनेशी बंडखोरी करत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये संभ्रम अवस्था निर्माण झाली होती. कृष्णा पाटील यांनी आपण शिवसेना (उबाठा) पक्षातच राहणार असल्याचा खुलासा केल्यानंतर महाविकास आघाडीने त्यांना पाठिंबा कायम ठेवला होता. भाजपचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांच्यासमोर विरोधी पक्षाकडून प्रभावी उमेदवार नसल्यामुळे त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. निवडणुकीचे नियोजन योग्यरित्या करुन त्यांनी ३०० पेक्षा जास्त मतदारांना सहलीसाठी पाठविले होते. त्यामुळे अमरनाथ राजूरकर हे पुन्हा विजयाची हॅट्रीक करणार हे जवळपास निश्चित होते.

निवडणुकीतील मतदानाची मतमोजणी आज (सोमवार) सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे पार पडली. मतमोजणीनंतर अमरनाथ राजूरकर यांनी ३३९ मताधिक्य मिळवत विजय संपादन केल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जाहीर केले. यावेळी निवडणूक निरिक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे या उपस्थित होत्या.

मतमोजणीपुर्वी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी मतमोजणीच्या प्रक्रियेबाबत मतमोजणी अधिकारी-कर्मचारी यांना निर्देश दिले. यावेळी उमेदवार तसेच मतमोजणी प्रतिनीधीही उपस्थित होते. तीन टेबलवर मतमोजणी अधिकारी, सहायक अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून मतमोजणी करण्यात आली. या मतमोजणीत ४२८ मते वैध ठरली. त्यापैकी अमरनाथ राजूरकर यांना ३३९ मते मिळाली तर अपक्ष उमेदवार कृष्णा नागेश पाटील यांना ८४ तर प्रशांत विराज इंगोले यांना ५ मते मिळाली. मतमोजणीत २३ मते अवैध ठरविण्यात आली. मतमोजणीनंतर निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांना विजयी घोषित केले. सदरील निवडणुकीत पान ४ वर

## खा.आष्टीकरांच्या मुलाची ठाकरे सेनेतून हकालपट्टी



नांदेड/प्रतिनिधी-हिंगोलीचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बंडखोर खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्या फुटीर भूमिकेनंतर पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत कृष्णा आष्टीकर यांची शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. खा. संजय राऊत यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे ही घोषणा केली.

नांदेड विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीतर्फेठाकरे गटाचे उमेदवार म्हणून रिंगणात उतरलेल्या कृष्णा आष्टीकर यांचा दारुण पराभव झाला. त्यांना अवघी ८४ मते मिळाली. निवडणुकीपूर्वीच खा.नागेश पाटील आष्टीकर हे शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता. त्यामुळे महाविकास आघाडीतील नगरसेवकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. काँग्रेसकडे मोठे संख्याबळ असतानाही ही जागा ठाकरे गटाच्या वाट्याला गेली होती. त्यामुळे या निवडणुकीकडे राज्याचे लक्ष लागले होते.दरम्यान, ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी निवडणुकीपूर्वीच कृष्णा आष्टीकर हा उमेदवार महाविकास आघाडीचा असल्याचा केवळ आभास निर्माण केला जात असून तोही वडिलांइतकाच चतुर आणि धूर्त आहे, असा आरोप केला होता.

## राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी;मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

## ५६ लाख शेतकऱ्यांचा सातबारा होणार कोरा



मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक निर्णय जाहीर करत तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून त्यांच्या कर्जाचा बोजा हलका होणार आहे. राज्याच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी असल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कर्जमाफी हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळावे आणि त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी मदत व्हावी, या उद्देशाने शासनाने हा निर्णय घेतला आहे. कर्जमाफी योजनेबाबत शासनाने तज्ज्ञ समिती नेमून अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा अभ्यास केला होता. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले असून अंमलबजावणीदरम्यान शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि काही मंत्र्यांची उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.याच अधिवेशनात महिला शेतकऱ्यांना कायदेशीर शेतकरी दर्जा देणारे विधेयकही मांडण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## बिनशर्त कर्जमाफीसाठी विरोधक आक्रमक




मुंबई/प्रतिनिधी-राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी (२२ जून) सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा आक्रमकपणे उपस्थित करत विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार आंदोलन केले. महायुती सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी विरोधकांनी केली.

नको अटी, नको शर्ती... शेतकऱ्यांना कर्जमुक्ती हवी असे फलक हातात घेऊन काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांच्यासह विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली.महायुतीने सत्तेत येताना शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात विविध अटी व शर्ती लादून शेतकऱ्यांना फसवी कर्जमाफी देण्यात आल्याचा आरोप विरोधकांनी केला. सरकारने दिलेले वचन पाळून शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती द्यावी, अशी मागणी आंदोलनादरम्यान करण्यात आली. या आंदोलनाच्या माध्यमातून सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात पान ४ वर

## विष्णुपुरी शिवारातील नदी घाटावर पोलीसांची धाड;दीड कोटींचा ऐवज जप्त




नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या ठिकाणी नांदेड ग्रामीण पोलीसांनी रविवारी मध्यरात्री धाड टाकुन दीड कोटी रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी चार जणांना पोलीसांनी अटक करण्यात आली.

अवैधरित्या रेतीचा उपसा करणाऱ्या रेती तस्करांविरुद्ध कारवाईचे सत्र नांदेड ग्रामीण पोलीसांकडून सुरुच आहे. राजकीय पाठबळाच्या जोरावर काही रेती तस्कर या व्यवसायात अजूनही सक्रीय आहेत. अशा रेती तस्करांच्या मुसक्या पोलीसांकडून आवळणे आवश्यक आहे. विष्णुपुरी शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा क्रेनच्या सहायाने अवैध उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर, फौजदार व्यंकट कुसमे, फौजदार बेग व पोलीस कर्मचाऱ्यांनी रविवारी मध्यरात्री नदी घाटावर अचानकरित्या छापा टाकला. नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या विश्वजीत नारायण दुधमल (वय २५) रा.ज्ञानेश्वरनगर, पूर्णा रोड,नांदेड, पांडूरंग गोविंद मोरे (वय ३६) रा.छत्रपती चौक,नांदेड, अर्जुन बालाजी बेटकर (वय ४५) रा.हिवरा (बु.) ता.पूर्णा, विजय संभाजीराव देशमुख रा.विष्णुपुरी यांना रंगेहाथ पकडले. घटनास्थळावरुन पोलीसांनी आठ टायर असलेले दोन क्रेन, एक जेसीबी, पाण्यावर तरंगणारे ११ तराफे, २२ ब्रास रेती, रेती उपसा करणारे पाच इंजीन असा १ कोटी ५१ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. पोलीसांनी पंचासमक्ष पाण्यात तरंगणारे ११ तराफे व त्यावरील रेती, पाच इंजीन असा मुद्देमाल नदीतच जाळून नष्ट करण्यात आले. पोलीस शिपाई हाणवता कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ठाकरेंच्या बैठकीला ३ आमदारांची दांडी

## आमदारांमध्येही फूट?

मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना (ठाकरे गट) सोडून सहा खासदारांनी बंडखोरी करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असतानाच आता ठाकरे गटातील आमदारांबाबतही नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. उद्धव ठाकरे यांनी सोमवारी बोलावलेल्या आमदारांच्या बैठकीला तीन आमदार अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्कांना उधाण आले आहे.

ठाकरे गटातील सहा खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर पक्ष नेतृत्वाकडून परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि आगामी रणनीती ठरविण्यासाठी सर्व आमदारांची बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, या बैठकीला आमदार संजय पोतनीस, संजय दरेकर आणि राहुल पाटील हे उपस्थित नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे खासदारांनंतर आता आमदारांमध्येही फूट पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.यापूर्वी उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या खासदारांची बैठक बोलावली होती. मात्र, नऊपैकी केवळ चार खासदारच या बैठकीला उपस्थित राहिले होते. त्यानंतर काही दिवसांतच सहा खासदारांनी बंडखोरीचा मार्ग स्वीकारत शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर आजच्या आमदारांच्या बैठकीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानीही राजकीय हालचालींना वेग आला असून बंडखोर खासदारांच्या प्रवेशाची तयारी सुरू आहे. दुसरीकडे, उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या आमदारांच्या बैठकीभोवती सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली असून बैठकस्थळी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.तीन आमदारांच्या अनुपस्थितीमुळे ठाकरे गटात आणखी मोठी राजकीय घडामोड घडणार का, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# निधी विकासासाठी ठीक; पण कोणाचा विकास?

**राजकारणात पक्षांतराचे समर्थन करण्यासाठी अनेक कारणे पुढे केली जातात. कधी विचारधारा बदलल्याचे सांगितले जाते, कधी नेतृत्वावरील विश्वास उडाल्याचे कारण दिले जाते, तर कधी मतदारसंघाच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांशी जुळवून घेण्याची गरज असल्याचा युक्तिवाद केला जातो. सध्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील काही खासदारांच्या संभाव्य बंडाच्या पार्श्वभूमीवरही हाच मुद्दा पुढे केला जात आहे. ''निधी मिळत नाही, त्यामुळे विकासकामे होत नाहीत'' हे त्यांचे प्रमुख स्पष्टीकरण आहे. मात्र हा युक्तिवाद जितका आकर्षक वाटतो, तितकाच तो प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे.लोकसभा निवडणूक लढविताना या सर्व खासदारांना राज्य आणि केंद्रात कोणाचे सरकार आहे, याची पूर्ण कल्पना होती. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष सत्तेत येणार नाही, हेही त्यांना माहीत होते. तरीही त्यांनी त्याच पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली आणि मतदारांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून विजय मिळवून दिला. आज अडीच वर्षांनंतर अचानक निधीअभावी विकास होत नसल्याचा साक्षात्कार होत असेल, तर हा प्रश्न विचारण्याचा अधिकार मतदारांना निश्चितच आहे की हा साक्षात्कार इतका उशिरा का झाला? मुळात सत्तेतूनच विकास होऊ शकतो, हा युक्तिवाद पूर्ण सत्य नाही. उलट तो अर्धसत्य आहे. महाराष्ट्रात आणि देशात अनेक नेत्यांनी आयुष्यभर विरोधी बाकांवर बसून जनतेचे प्रश्न मांडले आणि लोकांच्या मनावर अमिट ठसा उमटवला. शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांनी तीन दशकांहून अधिक काळ विरोधी पक्षाचे आमदार म्हणून काम केले. मधु लिमये, मधु दंडवते, जॉर्ज फर्नांडिस, कॉम्रेड ए. बी. वर्धन, कॉम्रेड इंद्रजित गुप्ता, कॉम्रेड सोमनाथ चॅटर्जी यांसारख्या नेत्यांनी सत्तेच्या बाहेर राहूनही लोकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. आपल्या नांदेड जिल्ह्यातील भाई केशवराव धोंडगे यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. त्यांनी सत्तेपेक्षा जनहिताला प्राधान्य दिले म्हणूनच त्यांचे कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे.खरे तर खासदाराचे काम केवळ निधी आणणे किंवा विकासकामांची उद्घाटने करणे एवढ्यावर मर्यादित नसते. संसद ही केवळ निधी मंजूर करून घेण्याची जागा नसून देशाच्या धोरणांवर चर्चा करून जनतेच्या हिताचे प्रश्न मांडण्याचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. केंद्र सरकारच्या धोरणांमधील त्रुटी अधोरेखित करणे, त्या धोरणांचा शेतकरी, कामगार, कष्टकरी, शेतमजूर, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांवर होणारा परिणाम सरकारच्या निदर्शनास आणून देणे आणि आवश्यक ते बदल घडवून आणण्यासाठी दबाव निर्माण करणे हे खासदारांचे मूलभूत कर्तव्य आहे.आज देशात शेतीमालाला हमीभावाचा प्रश्न कायम आहे. असंघटित कामगारांचे प्रश्न गंभीर आहेत. तरुणांच्या हाताला रोजगार नाही. विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळेवर होत नाहीत किंवा झाल्या तरी त्यात अनियमिततेचे आरोप होतात. एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांचे निकाल लागतात; परंतु उमेदवारांना वेळेत नियुक्त्या मिळत नाहीत. कंत्राटी भरती, बेरोजगारी आणि शिक्षण क्षेत्रातील गोंधळ यामुळे तरुण वर्गात अस्वस्थता आहे. या प्रश्नांवर संसदेत प्रभावीपणे आवाज उठवणे, सरकारला जाब विचारणे आणि जनतेच्या बाजूने ठाम भूमिका घेणे हे कोणत्याही खासदाराचे खरे काम आहे; मग तो सत्ताधारी पक्षाचा असो वा विरोधी पक्षाचा.मात्र अलीकडच्या काळात निधी आणि विकासकामे यांनाच लोकप्रतिनिधित्वाचे एकमेव मापदंड बनवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. त्यामुळे मतदारांच्या मनात अशी भावना निर्माण होऊ लागली आहे की; जनतेच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा निधी, प्रकल्प आणि राजकीय समीकरणांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. हा समज लोकशाहीसाठी निश्चितच धोकादायक आहे. खासदार किंवा आमदार यांचे काम केवळ निधी आणणे एवढेच नसते. सर्वसामान्य नागरिक त्यांच्या दैनंदिन अडचणी घेऊन लोकप्रतिनिधींकडे जातात. महसूल कार्यालयातील अडलेली कामे, प्रशासनाचा हलगर्जीपणा, शासकीय योजनांचा लाभ, आरोग्य व शिक्षणाशी संबंधित समस्या अशा असंख्य बाबींमध्ये लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपाची अपेक्षा असते. यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी लागत नाही. लागते ती इच्छाशक्ती, जनतेशी असलेली नाळ आणि प्रशासनावर प्रभावी दबाव निर्माण करण्याची क्षमता.विकासाच्या नावाखाली निधीची चर्चा होत असताना जनतेच्या मनात आणखी एक प्रश्न उपस्थित होत आहे. विकासकामे झाली पाहिजेत, यात कोणाचेही दुमत नाही. पण हा विकास नेमका कोणाचा होणार आहे? मतदारसंघाचा, की त्यामागे काही राजकीय आणि आर्थिक गणिते दडलेली आहेत? कारण आजचा मतदार पूर्वीइतका भोळा राहिलेला नाही. विकासकामांमधील आर्थिक हितसंबंध आणि राजकीय व्यवहार यांची त्याला जाणीव आहे. त्यामुळे निधीचा मुद्दा पुढे करून पक्षांतराचे समर्थन केले जात असेल, तर त्याकडे संशयाने पाहिले जाणे स्वाभाविक आहे.विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवर संबंधित खासदारांनी दीर्घकाळ मौन बाळगले. आता अचानक निधी आणि विकासाचा मुद्दा पुढे येत असल्याने हे स्पष्टीकरण खरोखरच जनहितासाठी आहे की स्वतःची राजकीय भूमिका योग्य ठरविण्यासाठी?, असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे.लोकशाहीत पक्ष बदलण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. परंतु त्यासाठी जनतेला पटेल अशी प्रामाणिक भूमिका असावी लागते. मतदारांनी एका विचारावर, एका पक्षावर आणि एका नेतृत्वावर विश्वास ठेवून मत दिलेले असते. निवडून आल्यानंतर त्या विश्वासाला तडा देताना किमान स्पष्टता आणि प्रामाणिकपणा अपेक्षित असतो.आज मतदारांना निधीपेक्षा प्रामाणिकपणा अधिक महत्त्वाचा वाटतो. कारण लोकप्रतिनिधीचे खरे मूल्यमापन तो किती निधी आणतो यावर नव्हे, तर तो जनतेच्या प्रश्नांसाठी किती संघर्ष करतो यावर होत असते. पक्षांतर करायचे असेल तर ते स्पष्टपणे करा; पण विकास आणि निधीच्या नावाखाली जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करू नका. कारण आजचा जागरूक मतदार एवढाच प्रश्न विचारत आहे, निधी विकासासाठी ठीक आहे; पण हा विकास नेमका कोणाचा?**

# मृत्यूनंतर उपयुक्त व्हायचे आहे,तर देहदान करावे





काही महिन्यापूर्वी मी देहदानाचा निर्णय घेतला व मुंबईच्या केईएम रुग्णालयात जाऊन त्याची औपचारिक प्रक्रिया पूर्ण केली. समाजातील मृत्यूविषयक अंधश्रद्धा, रूढी आणि गैरसमज दूर करण्यासाठी, मृत्यूनंतर शरीर वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी उपयोगी पडावे, तसेच विज्ञाननिष्ठ, विवेकवादी आणि मानवतावादी विचारांचा प्रसार व्हावा तसेच समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हा या निर्णयामागील हेतू होता. मृत्यूनंतरही समाजाच्या उपयोगी पडावे आणि इतरांनाही देहदान व अवयवदानासाठी प्रेरणा मिळावी, या भावनेतून मी देहदान करण्याचा निर्णय घेतला. माझ्या सारखी बरीच व्यक्ती देहदान करतात परंतु अलीकडेच घडलेल्या सेजल पवार प्रकरणाने काही अस्वस्थ करणारे प्रश्न उपस्थित केले.

मुंबईतील प्रतिष्ठित केईएम रुग्णालयातील एमबीबीएस विद्यार्थिनी सेजल पवार हिने 'प्रणित मोरे शो' या स्टँड-अप कॉमेडी कार्यक्रमात, शरीरदान केलेल्या मृतदेहांविषयी विशेषतः पुरुष मृतदेहांच्या जननेंद्रियाच्या आकारावरून अत्यंत किळसवाणे, अश्लील आणि असंवेदनशील विनोद केले. तिने आणि तिच्या सहकाऱ्यांनी अभ्यासादरम्यान मृतदेहांच्या खासगी अवयवांची थट्टा केल्याचे आणि प्रक्रियेच्या शेवटी ते अवयव कापून काढल्याचे हसत-हसत सांगितले. हा व्हिडिओ सोशल मीडियावर क्षणार्धात व्हायरल झाला आणि वैद्यकीय क्षेत्रासह संवेदनशील समाज घटकांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली. त्याही पूर्वीच्या एका व्हीडिओत ती केईएम हॉस्पिटलला चिंधी, सोबतच्या लोकांना कुरूप आणि शिक्षकांना विषारी म्हणते.

या घटनेने वैद्यकीय शिक्षण आणि व्यवसायाच्या पायाभूत नैतिकतेवरच घाव घातला. ज्या देहाकडे 'गुरू' म्हणून पाहिले जाते, ज्याच्याप्रती कॅडॅव्हरिक ओथ घेऊन कृतज्ञता व्यक्त केली जाते, त्या देहाची अशी जाहीर हेटाळणी करणे ही केवळ असंवेदनशीलता नव्हे, तर मानवतेच्या मुळावरचा आघात होता. डॉ. आशा कदम यांनी योग्यच म्हटले आहे की, त्यांच्या काळात डिसेक्शन हॉलमध्ये फॉर्मेलिनच्या तीव्र वासातही त्या देहाविषयी करुणा दाटून येत असे. त्या म्हणतात, विद्यार्थ्यांना शिकता यावे म्हणून कोणी देहदान केले असेल का, हा प्रश्न पडायचा. त्या देहावर अमानवी विचार करणे तर सोडाच, पण तसा विचारही कधी कोणाकडून ऐकला नाही. हा संस्कारांचा भाग आहे. जो समाज ३७० रुपयांची बिर्याणी उकरून खाणाऱ्याची नोकरी गेल्याचे समर्थन करतो, तो समाज एका महिला डॉक्टरने मृतदेहांवर काढलेल्या अश्लील उद्गारांकडे सुरुवातीला दुर्लक्ष कसा करतो? या दुटप्पीपणाकडे त्यांनी बोट दाखवले. अनेकांनी सोशल मिडीयावर तिखट प्रतिक्रिया दिल्या की, तिच्यासारख्या नीच मानसिकता असणाऱ्या लोकांना धडा बसला पाहिजे. आणि ज्या शोमध्ये हे चालले, तो शो करणाऱ्या प्रणित मोरेवर कारवाई झाली पाहिजे.

या वादाने 'डार्क कॉमेडी' आणि 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' या नावाखाली होणाऱ्या अतिरेकाचाही कळस गाठला. केरळच्या डेंटिस्ट डाफ्नी क्लेयर यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये या मुद्द्याचा अत्यंत परखड समाचार घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, मृतदेहाच्या खासगी अवयवांवर हसणे ही 'डार्क कॉमेडी' नाही. 'डार्क कॉमेडी'चा उगम हा पीडितांनी स्वतःच्या दुःखावर विनोद करून त्यातून सावरण्याच्या प्रयत्नातून झाला. पण जो अनुभव तुम्ही स्वतः घेतलेला नाही, त्या दुसऱ्याच्या शरीराची किंवा अवयवांची चेष्टा करून तिला 'डार्क कॉमेडी' म्हणण्याचा नैतिक अधिकार कोणालाच नाही. हा मानवी प्रतिष्ठेचा भंग आहे. डॉ. क्लेयर यांनी पुढे एक खोल सामाजिक विसंगती अधोरेखित केली. त्या म्हणतात, जेव्हा सेजलचा व्हिडिओ पहिल्यांदा समोर आला, तेव्हा पुरुषांनीच तिला फॉलो केले, हसले आणि प्रसिद्धी मिळवून दिली. त्यांनी तिचे फॉलोअर्स वाढवले. पण जेव्हा ३७० बिर्याणीवाल्याचे प्रकरण बाहेर आले. जे एका स्त्रीवरील लैंगिक अत्याचाराचे उदात्तीकरण होते, तेव्हा महिलांनी तात्काळ एकजुटीने निषेधाचा आवाज उठवला. याचा अर्थ, पुरुषांचा अपमान झाला की स्त्रिया पुढे येतात, पण स्त्रियांचा अपमान झाला (किंवा पुरुष देहदात्यांचा) की पुरुष हसतात आणि 'फॉलो' करतात, विशेषतः ती स्त्री दिसायला आकर्षक असेल तर! या निरीक्षणामुळे हा वाद केवळ एका विद्यार्थिनीच्या बेजबाबदार वक्तव्यापुरता न राहता, समाजाच्या सामूहिक नैतिक बैठकीवर प्रश्न उपस्थित करणारा ठरला. दोन्ही प्रकरणे निंदनीय आहेत; एक मृत्यूनंतरची क्रूरता आणि अनादर, तर दुसरे जिवंत स्त्रीविरुद्धच्या लैंगिक हिंसेचे उत्सवीकरण. दोघांनाही जबाबदार धरले गेले पाहिजे, पण दोन्ही प्रकरणे एकसमान गुन्हे नाहीत.

सेजल पवार प्रकरणाने आणखी एक बाब अधोरेखित केली. केवळ वैद्यकीय पदवी मिळवल्याने माणुसकी, संवेदनशीलता किंवा नैतिकता आपोआप येत नाही. ज्या कोट्यवधी स्त्रियांना शिक्षणाची संधीही मिळत नाही, तिथे ही संधी मिळालेल्या एका विद्यार्थिनीने तिचा असा दुरुपयोग करावा, ही केवळ शोकांतिका आहे. सुदैवाने, केईएम प्रशासनाने चौकशी करून तिला सक्तीच्या रजेवर पाठवले आणि समुपदेशनाची शिफारस केली; तिने जाहीर माफीही मागितली. परंतु, या घटनेने वैद्यकीय शिक्षणात नैतिक मूल्ये, संवादकौशल्य आणि करुणेचे शिक्षण अधिक बळकट करण्याची नितांत गरज निर्माण केली आहे.मानवी जीवनाची खरी किंमत ही केवळ त्याच्या कालावधीत नसून, त्या जीवनाने इतरांसाठी काय केले यात दडलेली असते. हे विधान आपण पिढ्यानपिढ्या ऐकत आलो आहोत. पण याचा सर्वांत सखोल अर्थ लक्षात येतो तो शरीरदानाची संकल्पना समजून घेतल्यावर. मृत्यू हे एक निर्विवाद, अटळ सत्य आहे. प्रत्येकाला एक ना एक दिवस हे भौतिक शरीर सोडावेच लागते. मातीत मिसळून जाणे, राख होणे किंवा पाण्यात विलीन होणे या नेहमीच्या पर्यायांपलीकडे जाऊन, आपला देह हा भविष्यातील ज्ञानाचा आधारस्तंभ बनू शकतो, ही जाणीवच मुळात थक्क करणारी आहे.

शरीरदान म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या मृत्यूनंतर आपला संपूर्ण देह वैद्यकीय शिक्षण, शस्त्रक्रिया कौशल्य विकास आणि वैज्ञानिक संशोधन यांसारख्या उदात्त हेतूंसाठी कायदेशीररीत्या दान करणे. ही निव्वळ एक वैद्यकीय प्रक्रिया किंवा कायदेशीर बांधिलकी नाही; हे तर मानवतेसाठी दिलेले अत्यंत मौल्यवान आणि निःस्वार्थी योगदान आहे. समाजात अनेकदा अवयवदानाबद्दल चर्चा होते, मात्र शरीरदानाचे अनन्यसाधारण महत्त्व तितकेसे अधोरेखित होत नाही. एका व्यक्तीने केलेले शरीरदान थेटपणे शेकडो डॉक्टरांना प्रशिक्षित करण्यात आणि त्यांच्यामार्फत हजारो रुग्णांचे प्राण वाचवण्यात कारणीभूत ठरते. हे दान म्हणजे मृत्यूनंतरही समाजासाठी ज्ञान, सेवा आणि मानवतेची ज्योत अखंड प्रज्वलित ठेवण्याचे विलक्षण सामर्थ्य बाळगून आहे. शरीरदानाची संकल्पना समजून घेताना सर्वप्रथम ती अवयवदानापासून वेगळी करणे आवश्यक आहे. अवयवदानामध्ये, एखादी व्यक्ती 'मेंदू-मृत' (ब्रेन-स्टेम डेड) झाल्यानंतर तिचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, डोळे, त्वचा असे जीवनदायी अवयव अन्य गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी दिले जातात. याउलट, शरीरदानामध्ये संपूर्ण देह हा वैद्यकीय महाविद्यालये, शासकीय रुग्णालये किंवा मान्यताप्राप्त संशोधन संस्थांना शरीररचनाशास्त्र (अॅनाटॉमी) शिकण्यासाठी, शल्यचिकित्सकांच्या सरावासाठी आणि नवीन वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी उपलब्ध करून दिला जातो.



कल्पना पांडे

हे दान केवळ एका अवयवापुरते मर्यादित न राहता, संपूर्ण शरीर हे भविष्यातील वैद्यकीय तज्ज्ञांना घडवणारे पहिले आणि सर्वांत महत्त्वाचे पाठ्यपुस्तक बनते. भारतासारख्या विशाल देशात शरीरदान हे 'अॅनाटॉमी अॅक्ट' आणि संबंधित राज्यांच्या विशिष्ट नियमांनुसार नियंत्रित केले जाते. महाराष्ट्रात 'महाराष्ट्र अॅनाटॉमी अॅक्ट, १९४९' या कायद्यांतर्गत शरीरदानाला पूर्ण कायदेशीर मान्यता आहे. कोणतीही सज्ञान आणि सुस्थितीतील व्यक्ती आपल्या हयातीत इच्छापत्रात नोंद करून किंवा संबंधित संस्थेकडे अधिकृत नमुन्यात अर्ज करून हा संकल्प करू शकते. कायदेशीर दृष्ट्या मृत्यूनंतर नातेवाईकांनी ही इच्छा पूर्ण करणे बंधनकारक असले, तरी सामाजिक संवेदनशीलता आणि कुटुंबाची सहमती ही अत्यंत महत्त्वाची असते. म्हणूनच, आपला हा निर्णय कुटुंबीयांना विश्वासात घेऊन, त्यांच्या भावना समजावून, त्यांची संपूर्ण संमती घेऊनच केलेला असावा, हे तितकेच आवश्यक आहे.वैद्यकीय शिक्षणाचा पाया हा मानवी शरीररचनेच्या अत्यंत बारकाईच्या आणि सखोल आकलनावर उभा असतो. हृदयाचे कप्पे, फुफ्फुसांची पोकळी, स्नायूंचे आकुंचन-प्रसरण, रक्तवाहिन्या आणि मज्जातंतूंचे अदृश्य जाळे; या सर्वांची गुंतागुंतीची मांडणी केवळ पुस्तकातील सपाट आकृत्या, डिजिटल स्क्रीनवरील प्रतिमा किंवा व्हिडिओ पाहून समजून घेणे केवळ अशक्य आहे. यासाठी प्रत्यक्ष मानवी देहावर शवविच्छेदन (डिसेक्शन) करण्याचा अनुभव हाच खरा शिक्षक ठरतो.

शरीरदानातून मिळालेला हा देह, ज्याला वैद्यकीय परिभाषेत 'कॅडॅव्हर' म्हटले जाते, तो विद्यार्थ्यांसाठी एका त्रिमितीय, जिवंत पाठ्यपुस्तकाप्रमाणे असतो. याच कारणामुळे जगभरातील नामांकित वैद्यकीय संस्थांमध्ये शरीरदात्यांना 'पहिले शिक्षक' किंवा 'सायलेंट मेंटॉर' या अत्यंत आदरयुक्त संज्ञांनी संबोधले जाते. हा देह बोलत नसला, तरी त्याच्या शांततेतून तो विद्यार्थ्यांना मानवी शरीराचे प्रत्येक गुपित उलगडून दाखवतो. एक नवोदित डॉक्टर जेव्हा आपल्या कारकिर्दीची सुरुवात करतो, तेव्हा मानवी शरीराशी त्याचा पहिला प्रत्यक्ष संवाद नेमका याच दान केलेल्या देहामुळे घडतो. ज्या हातांनी भविष्यात असंख्य रुग्णांवर गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करायच्या असतात, त्या हातांना सुरक्षित सरावाचे पहिले व्यासपीठ हा देहच उपलब्ध करून देतो. याचा अर्थ, एका शरीरदात्याच्या देहावर प्रशिक्षण घेऊन तयार झालेला एकच शल्यचिकित्सक आपल्या संपूर्ण आयुष्यात हजारो जीव वाचवू शकतो. हीच तर या दानाची अफाट ताकद आहे. मात्र, दुर्दैवाने भारतात शरीरदानाचे प्रमाण गरजेच्या तुलनेत अत्यल्प आहे. आदर्शतः दहा विद्यार्थ्यांमागे किमान एक देह उपलब्ध असावा अशी अपेक्षा असताना, प्रत्यक्षात ३० ते ४० किंवा काही ठिकाणी तर ७५ विद्यार्थ्यांना एका देहावर अवलंबून राहावे लागते. याचा विपरीत परिणाम वैद्यकीय शिक्षणाच्या प्रात्यक्षिक गुणवत्तेवर होतो. विद्यार्थ्यांना स्टूलवर उभे राहून दुरून पाहावे लागते, हाताचा सराव मिळत नाही आणि पुस्तकी ज्ञानावरच भिस्त ठेवावी लागते. या उणीवेची तीव्रता लक्षात घेता, समाजात शरीरदानाची जनजागृती निर्माण करणे ही नितांत गरज आहे.

शरीरदानाचा निर्णय घेताना कुटुंबीयांच्या मनात एक साहजिक, रास्त प्रश्न असतो मृत्यूनंतर आमच्या प्रिय व्यक्तीच्या देहाची प्रतिष्ठा आणि सन्मान राखला जाईल ना? ही चिंता पूर्णपणे मानवी आणि स्वाभाविक आहे. मात्र, मान्यताप्राप्त वैद्यकीय संस्थांमध्ये या देहाशी अत्यंत आदराने, पवित्रतेने आणि संवेदनशीलतेने वागले जाते. हा केवळ तोंडी आश्वासनाचा भाग नसून, कडक नियमावली आणि वैद्यकीय आचारसंहितेचा तो गाभा आहे. देह प्राप्त झाल्यापासून ते अभ्यास पूर्ण होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्याची प्रतिष्ठा राखली जाते. संस्थेत आल्यावर देहाला एक नोंदणी क्रमांक दिला जातो, जेणेकरून दात्याची वैयक्तिक ओळख पूर्णपणे गोपनीय राहते. विद्यार्थ्यांना दात्याचे नाव, गाव किंवा कुटुंब याची कोणतीही माहिती दिली जात नाही. देह जतन करण्यासाठी फॉर्मेलिनसारखी रसायने (एम्बॅल्मिंग) वापरून तो सुस्थितीत ठेवला जातो. अभ्यासा-व्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी देहाचा वापर करण्यास कायद्याने सक्त मनाई आहे. थट्टा-मस्करी, छेडछाड किंवा प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल असे कोणतेही कृत्य करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई होते. आजकाल जवळपास सर्वच वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अभ्यास सुरू करण्यापूर्वी विद्यार्थ्यांकडून 'कॅडॅव्हरिक ओथ' ही शपथ दिली जाते. या शपथेत विद्यार्थी देहदात्याला आपले गुरूस्थान देतात, त्यांच्या उदात्त त्यागाबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतात आणि देहाला केवळ ज्ञानप्राप्तीचे पवित्र साधन मानून आदरपूर्वक वागण्याचे वचन देतात.

याशिवाय, अनेक संस्था दरवर्षी शरीरदात्यांच्या कुटुंबांना आमंत्रित करून 'कृतज्ञता सोहळा' आयोजित करतात, जिथे संचालक, प्राध्यापक आणि विद्यार्थी एकत्र येऊन या दात्यांच्या कार्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतात. शरीरदानाची सामाजिक गरज आणि योगदान यांचे दूरगामी पैलू समजून घेतले पाहिजेत. हे योगदान केवळ विद्यार्थ्यांपुरते मर्यादित नाही. गुंतागुंतीच्या न्यूरोसर्जरी, कार्डियाक सर्जरी, ऑर्थोपेडिक शस्त्रक्रिया यांची नवीन तंत्रे आधी शरीरदान केलेल्या देहांवर प्रयोग करूनच परिपूर्ण केली जातात. नव्याने विकसित होणारी वैद्यकीय उपकरणे जसे की स्टेंट, पेसमेकर, कृत्रिम सांधे यांची सुरक्षितता चाचणी ही मानवी देहावर केली जाते. न्यायवैद्यक शास्त्राच्या (फॉरेन्सिक मेडिसिन) विद्यार्थ्यांना देहाच्या विघटन प्रक्रिया, जखमांचे स्वरूप यांचे शिक्षणही अशा देहांवरच होते. एखाद्या दुर्मिळ **क्रमशः**

# खानापूरात शॉर्टसर्किटने तीन दुकाने जळून खाक

## लॉन्ड्री,फर्निचर व किराणा दुकानाचे लाखोंचे नुकसान;जीवितहानी टळली

देगलूर/प्रतिनिधी- तालुक्यातील खानापूर येथे शुक्रवारी (दि.१९) रात्री शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत तीन दुकाने जळून खाक झाली. या आगीत लॉन्ड्री, फर्निचर आणि किराणा दुकानातील साहित्य पूर्णपणे भस्मसात झाले असून सुमारे सहा लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

गावातील महादेव मंदिरासमोरील बाबूभाई मेहताबसाब शेख यांचे किराणा दुकान, त्यालगत हणमंत वरटी यांचे लॉन्ड्री दुकान आणि शेजारी गोविंद पांचाळ यांचे फर्निचर दुकान आहे. शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास अचानक शॉर्टसर्किट होऊन आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने परिसरात घबराट पसरली. फर्निचर दुकानातील मशीन, सागवानी चौकटी, तयार दरवाजे तसेच ग्राहकांसाठी बनवून ठेवलेले सहा सागवानी पलंग आगीत जळून खाक झाले. लॉन्ड्रीमधील यंत्रसामग्रीसह ग्राहकांनी धुण्यास दिलेले कपडेही जळाले. तर किराणा दुकानातील संपूर्ण माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. त्यानंतर देगलूर नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत तिन्ही दुकानांतील बहुतांश साहित्य जळून गेले होते.या घटनेत तिन्ही व्यावसायिकांचे मिळून सहा लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या आगीमुळे संबंधित व्यापाऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून शासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता

* संपर्क कार्यालय *

व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१

**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,

**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८

E-mail: nandedwarta@mail.com

## विष्णुनगरमध्ये तीन लाखांची चोरी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील विष्णुनगर येथे चोरट्यांनी एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी तीन लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

चंद्रकांत दिगांबर दमकोंडवार (वय ५२) रा.विष्णुनगर,नांदेड हे घराला कुलूप लावून कुटुंबियांसमवेत बाहेरगावी गेले असतांना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा ३ लाख १७ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला आहे.

# किनवटमध्ये दुधाच्या दरवाढीसोबत भेसळीचाही कहर;भेसळखोरांवर कारवाईची मागणी

किनवट/प्रतिनिधी-दुधात पाण्याची भेसळखोरी आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळखोरी किनवट शहरासह तालुक्यात राजरोसपणे सुरु असून, अद्याप तरी अन्न व औषध प्रशासनाने भेसळखोरीला रान मोकळे ठेवले आहे.

किनवट तालुक्यात तरी सुद्धा धास्तीनेच भेसळयुक्त दूधाची कमालीची आवक घटल्याच्या संधीचा फायदा घेऊन दुधविक्रेत्यांनी सत्तर रुपयांवरुन ऐंशी रुपये पाणी मिश्रीत दुधाची दरवाढ केली आहे. या भेसळखोरीमुळे चांगले दूध विकणारेही परेशान होतांना दिसतात. म्हणून अन्न व औषध प्रशासनाने अतीदुर्लक्षीत किनवट तालुक्याकडे विशेष लक्ष देऊन भेसळखोरांविरुद्ध मकोकांतर्गत कारवाई करण्याच्या मागणीने जोर धरलाय. अन्यथा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे किनवटचे शिष्टमंडळ धाव घेणार असल्याचे सांगण्यात आले. मागच्या वर्षी दूधाची दरवाढ करून दूध विक्रेत्यांनी ५० रुपयावरुन ७० रुपये प्रति लिटर



दूधाचे भाव केले होते. आज पुन्हा दहा रुपयांनी भाववाढ करून ८० रुपये लिटर दुधाचे करून सुद्धा त्यांचे समाधान झाले नाही. पाणी मिश्रीत दुधाच्या विक्रीवर सपाटा लावला आहे. तालुका प्रशासनाने या भेसळखोरांच्या मुसक्या आवळून मकोकांतर्गत कारवाई केली जावी अशी मागणी आता समोर आली आहे. कारण ही अकारण दरवाढ आणि भेसळखोरी सर्वसामान्यांना मुळीच परवडणारी नाही. शिवाय पाणी मिश्रीत दूधाला ८० रुपये लिटर भाव असेल तर पाणी विरहित दूधाला १२० रुपये दर मिळताना दिसतोय, त्यामुळे जनसामान्यांच्याही प्रतिक्रिया उमटायला सुरूवात झाली आहे. सर्वत्र धाडी पडताहेत मग किनवटमध्येच का नाही? असा तमाम जनतेचा सवाल आहे. भेसळखोरी थांबली तरच दर्जेदार दूध उत्पादकांच्या दूधाला न्याय मिळणार आहे. दूध उत्पादक पशुपालकांकडून दूध विक्रेत्या दुकान चालकांना पुरविण्यात येत असलेल्या दूधाच्या प्रतवारीत समानता असेलच असे नाही. गुणनियंत्रण मापकाच्या माणकानुसार दुकानचालक सर्वांचे दूध एकत्रित करून पशुपालकांना मात्र प्रतवारीनुसार पैसे देतात. सर्वांना समान भाव मिळत नाही. परंतु विक्री मात्र एकाच दराने केली जाते. पाणी मिश्रीत भेसळखोरीचे दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची आरोग्य विभाग, महसूल, पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाच्या साक्षीने विक्री करून जनारोग्याची वाट लावीत असतील तर भेसळखोरांवर कारवाई झालीच पाहिजे. दुभती जनावरे नसतांनाही सिलबंद पॉकेटच्या दूधाचा खुल्या दूधात भेसळ करून विकणारे काही महाभाग आज अडचणीत सापडले आहेत. कांहींचे जेमतेम दूध असतांना पॉकेटच्या दूधाचा आणि रस्त्यात मिळेल ते पाणी दूधात भेसळ करून विकायचे. ७० रुपये भाव दिल्यानंतरही दूधात पाण्याची भेसळ चालूच होती. असा अनुभव अनेकांनी कथन केलाय.

# निमित्त कंदुरीचे...पण शिजली राजकीय खिचडी!

## दरगाह परिसरात मेजवानी,पण राजकीय खिचडीचीच जास्त चव;जिल्हा बँक निवडणुकीपूर्वी भेटीगाठींनी रंगल्या चर्चा

माहूर/प्रतिनिधी-माहूर-किनवटच्या राजकारणात सध्या पक्षांतराचे वारे जोरात वाहत असताना मंगळवार (दि.१६) रोजी शेख फरीद वझरा येथील दरगाह परिसरात आयोजित करण्यात आलेल्या कँदुरी कार्यक्रमाने राजकीय वर्तुळात वेगळीच चर्चा रंगवली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दत्तराव मोहिते यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळाली. त्यामुळे ही कँदुरी श्रद्धेची होती की आगामी राजकीय समीकरणांची, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनानंतर तालुक्यातील राजकीय परिस्थिती वेगाने बदलत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मधील काही नेते आधीच सत्ताधारी गटात दाखल झाले आहेत. तर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणखी काही जण घरबदलीच्या तयारीत असल्याच्या चर्चा सुरू आहेत. अशा वातावरणात कँदुरीच्या निमित्ताने एकाच पंगतीत विविध पक्षांचे नेते दिसल्याने उपस्थितांच्या भुवया उंचावल्या. जे नेते कालपर्यंत एकमेकांवर टीकेची झोड उठवत होते, तेच आता हसत-खेळत गप्पा मारताना दिसल्याने कार्यकर्त्यांमध्येही कुजबूज सुरू झाली. काहींनी तर ही कँदुरी नसून जिल्हा बँक निवडणुकीची पूर्वतयारी बैठकच होती का? असा उपरोधिक सवाल उपस्थित केला. राजकारणात योगायोगांवर कोणी सहज विश्वास ठेवत नाही. त्यामुळे कँदुरीच्या पंगतीत वाढलेले मटण आणि राजकीय समीकरणांच्या शिजत असलेल्या खिचडीचा संबंध जोडला जात आहे. निवडणुका जवळ येत असताना अशा भेटीगाठी वाढणे स्वाभाविक मानले जात असले, तरी या कार्यक्रमानंतर तालुक्यातील राजकीय चर्चांना चांगलेच उधाण आले आहे. कँदुरी संपली, पाहुणे निघून गेले; मात्र कोण कुणाच्या संपर्कात?, कोण कुठे जाणार? आणि जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कोणाची मोट बांधली जाणार? या चर्चांची मेजवानी अजूनही माहूर-किनवटच्या राजकीय वर्तुळात रंगलेली दिसत आहे.

# पोलिसांनी गहाळ झालेले मोबाईल शोधून मालकांना दिले परत

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर पोलीसांनी हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत उल्लेखनीय यश मिळवत तब्बल २५ गहाळ मोबाईल फोन शोधून त्यांच्या मूळ मालकांना परत केले. हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलची एकूण किंमत ३ लाख ७४ हजार रुपये इतकी आहे.

पोलीस अधीक्षक अविनाशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांच्या सूचनांनुसार ही विशेष मोहीम राबविण्यात आली. देगलूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांत गहाळ मोबाईल प्रकरणांचा आढावा घेत तांत्रिक तपासाला गती दिली. तांत्रिक माहितीच्या आधारे हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात आला. या कारवाईमध्ये मोबाईल शोध पथकाचे पोलीस हेडकॉन्स्टेबल के. जी. तलवारे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच देगलूर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून मोबाईल हस्तगत करण्यासाठी मोलाची मदत केली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे विविध ठिकाणांहून मोबाईल शोधून काढण्यात यश आले. आवश्यक पडताळणी पूर्ण करून संबंधित नागरिकांना त्यांचे मोबाईल परत देण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानत समाधान व्यक्त केले.




सराफा येथील सुशिला रामविलास सारडा यांचे नुकतेच निधन झाले. आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देवून कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी रामविलास सारडा, केदार सारडा, श्रीनिवास सारडा, सत्यनारायण सारडा, तुलजेश यादव, शंकर पिनोजी, आनंद वर्मा व इतर उपस्थित होते.

# टाकळी जि.प.शाळेत जागतिक योग दिन साजरा

देगलूर/प्रतिनिधी- देगलूर तालुक्यातील टाकळी (ज) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला.

या योग दिनानिमित्त मुख्याध्यापक विजय अन्नमवार, तानाजी बिरादार, श्री.कोरे सर यांनी योग, ध्यान, प्राणायाम, कपालभाती व विविध प्रकारचे असणे विद्यार्थ्याकडून करून घेतली. याप्रसंगी मुख्याध्यापक विजय अन्नमवार, तानाजी बिरादार, शालेय व्यवस्थापन समितीचे



अध्यक्ष आकाश निवृत्ती गायकवाड व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## नांदेडमध्ये सव्वा लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील मिल्लतनगर येथे एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी एक लाख ३० हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

मोहम्मद जुबेरोद्दीन निजामोद्दीन (वय ३५) रा.मिल्लतनगर, नांदेड यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा एक लाख तीस हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला आहे.या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८१४/२०२६
मोहम्मद जाफर वि.निरंक

अर्जदार : १. मोहम्मद जाफर पि.मोहम्मद उमर, वय : ५५ वर्षे धंदा : व्यवसाय रा.गल्ली नं.१७, पीरबुऱ्हाननगर, तरोडा बु.नांदेड ता. जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मोहम्मद उमर पि.मोहम्मद रमजान यांचे वारस आहेत. मयत मोहम्मद उमर पि.मोहम्मद रमजान यांचा ०५/०४/२०२६ रोजी मृत्यु झाला आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०७/०८/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
५ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

"आदेशावरुन"
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

## वरिष्ठ कार्यालयाच्या दिरंगाईचा फटका

# मुखेड उपजिल्हा रुग्णालयातील २५० बालकांचे जन्म दाखले रखडले

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात जन्माला आलेल्या सुमारे २५० बालकांचे जन्म दाखले मागील अनेक महिन्यांपासून रखडले आहेत. वरिष्ठ कार्यालयाकडून मंजुरी मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे पालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सन २०२५ मधील ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर या तीन महिन्यांतील बालकांच्या जन्म दाखल्यांची नोंदणी अद्याप पूर्ण झालेली नाही. नियमानुसार, जन्मानंतर २१ दिवसांच्या आत नोंदणी केल्यास रुग्णालय स्तरावरूनच दाखला मिळणे अपेक्षित असते. २१ दिवसांनंतर नोंदणी झालेल्या शेकडो प्रकरणांची फाईल रुग्णालय प्रशासनाने पुढील मंजुरीसाठी पुणे येथील 'उपसंचालक, जन्म-मृत्यू निबंधक' कार्यालयाकडे पाठवली आहे. मात्र, तेथून मंजुरी मिळण्यास कमालीचा विलंब होत असल्याने पालकांचे मोठे हाल होत आहेत.सध्या शाळा प्रवेश, आधार कार्ड काढणे आणि इतर शासकीय सवलतींचा लाभ घेण्यासाठी जन्म दाखल्याची अत्यंत आवश्यकता आहे. रुग्णालयाकडून हे दाखले वेळेवर मिळत नसल्याने पालकांना वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. स्थानिक रुग्णालय प्रशासन वरिष्ठ कार्यालयाकडे बोट दाखवत आहे, तर वरिष्ठ कार्यालयाकडून मंजुरी मिळत नसल्याची माहिती समोर येत आहे. स्थानिक रुग्णालयाने कागदपत्रे पाठवूनही मंजुरी का मिळत नाही, असा संतप्त सवाल पालक उपस्थित करत आहेत. आता या प्रकरणात जिल्हाधिकारी किँवा वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून पालकांची होणारी ही हेळसांड थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# मौजे पेंदा येथे एक लाखाचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील मौजे पेंदा येथे स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन एक लाख रुपयाचा गुटखा जप्त केला आहे.

डोंगराळ व जंगल भागात असलेल्या मौजे पेंदा येथे अवैधरित्या गुटखा विक्री होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. शुक्रवार दि.१९ जून रोजी सायंकाळी फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी पेंदा येथे नुर मोहम्मद उर्फ बबलू शेख करीम याच्या घरावर धाड टाकुन पोलीसांनी १ लाख ६ हजार रुपयांचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा जप्त केला. फौजदार मिलिंद सोनकांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किनवट पोलीस ठाण्यात मोहम्मद उर्फ बबलू शेख करीम रा.पेंदा व अशोक ठाकुर रा.इचोडा जि.आदिलाबाद या दोघांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास लेंनगुळे हे करीत आहेत.

## रेती वाहतूक करणारा हायवा पकडला

नांदेड/प्रतिनिधी-भोकर शहरातील म्हैसा टी पॉईंट रोडवर अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी पकडला आहे. हायवा ट्रक मधून पाच ब्रास रेती व हायवा पोलीसांनी जप्त केला.

याप्रकरणी फौजदार सुरेश जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अविनाश मकासुरे रा.आमदुरा व पवन पवार रा.लामकानी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **AGRAWAL PALAK SUBHASH** which now I am, changing as (new name) **PALAK AKASH AGRAWAL**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**PALAK AKASH AGRAWAL**
R/o 2-9-114, Somesh Colony
Nanded-431601
M.No.-7218212400

# गद्दार खासदारांविरोधात धर्माबादेत संतापाचा स्फोट

## प्रतिकात्मक फोटोला जोडे मारुन केला निषेध

धर्माबाद/प्रतिनिधी-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांच्या भूमिकेविरोधात धर्माबाद येथे शिवसैनिकांनी तीव्र संताप व्यक्त करत निषेध आंदोलन केले. दि.२१ जून रोजी शहरातील पानसरे चौकात एकत्र जमलेल्या शिवसैनिकांनी संबंधित खासदारांच्या प्रतिकात्मक छायाचित्रांना जोडे मारून निषेध नोंदविला. यावेळी परिसर घोषणांनी दुमदुमून गेला.

राज्यातील राजकीय घडामोडींमुळे निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर धर्माबादमधील शिवसैनिकांनी खा. नागेश पाटील आष्टीकर, संजय दिना पाटील, संजय जाधव, ओमराजे निंबाळकर, संजय देशमुख आणि राजाभाऊ वाघचौरे यांच्या विरोधात आंदोलन छेडले. आंदोलना दरम्यान संबंधित खासदारांच्या प्रतिकात्मक छायाचित्रांना जोडे मारण्यात आले तसेच जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.गद्दार खासदारांचं करायचं काय, खाली मुंडकं वर पाय, शिवसेना अंगार है, बाकी सब भंगार है, जय भवानी, जय शिवाजी, शिवसेना के गद्दारों को, जूते मारो सालों को तसेच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा विजय असो अशा घोषणांनी पानसरे चौक परिसर दणाणून गेला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या आंदोलनात नांदेड जिल्हा उपप्रमुख गणेश गिरी, तालुकाप्रमुख मारोती पाटील कागेरू, शहरप्रमुख बालाजी बनसोडे, विधानसभा प्रमुख शिवराज पाटील मोकलिकर, शहर संघटक राजू शिरामणे, मनसे तालुकाध्यक्ष दत्तात्रय कावडे, ज्येष्ठ शिवसैनिक गणपत कात्रे, सामाजिक कार्यकर्ते भगवान कांबळे, प्रविण जमादार, पांडुरंग पांचाळ, गणेश दुदुलवाड, अशोक रामोड, वीरभद्र वारले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# आष्टीकरांच्या पक्षांतराने ७६ हजार मतदारांचा विश्वास डळमळला

## किनवटमध्ये सर्वत्र संतापाची लाट,उबाठा शिवसेना मात्र संयमाच्या भूमिकेत

किनवट/प्रतिनिधी- हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा.नागेश पाटील आष्टीकरांनी उबाठाशिवसेनेचा विश्वास घात करुन शिंदेंच्या शिवसेनेच्या तंबूत घुसणे पसंद केले, मात्र त्यांच्या स्वार्थी भूमिकेमुळे किनवट विधानसभा मतदारसंघातील ७६,५६७ मतदारांच्या पक्षनिष्ठेला हादरा दिलाय. केलेल्या विश्वास घातावरुन हिंगोली लोकसभा मतदारसंघात उबाठा शिवसैनिकांच्या संयमाचा बांध फुटला असून सर्वच माध्यमांवर जोडेमारो, प्रतिमादहन आणि शिव्यांची लाखोली ऐकायला मिळते. सर्वत्र संतापाची लाट उसळली असली तरी किनवट तालुका उबाठा शिवसेनेच्या तालुका प्रमुखांनी मात्र आंदोलनाची भूमिका अद्यापही स्पष्ट केलेली दिसत नाही, त्यामुळे सर्वत्र तर्कवितर्कांने जोर धरल्याचे पहायला मिळते.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाविकास आघाडी समोर भाजपा-शिंदे शिवसेना महायुतीचे तगडे आव्हान



असतांना सुद्धा किनवट व माहूर तालुक्यातील स्व. बाळासाहेबांचे आणि उबाठा शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांचे कडवे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करून तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदीप नाईकांच्या ताकदीवर किनवट विधानसभा मतदारसंघातून खा.आष्टीकरांना ७६,५६७ मिळाली. तर भाजपा महायुतीच्या ताकदवार विविध संघटना प्रचारात उतरल्या असतानाही शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार बाबूराव कदम कोहळीकरांना ७५,३८९ मिळाली होती. सारांश असा की, मूळ शिवसेनेच्या उभ्या फाळणीनंतरही किनवट विधानसभा मतदारसंघात खा.आष्टीकरांना मतदारांनी डोक्यावर घेतले हे अगदी स्पष्ट झाले, मात्र स्वहव्यासापोटी खा. आष्टीकरांनी पक्षांतराच्या कोलांटउड्या मारुन किनवट विधानसभा मतदारसंघातील ७६,५६७ मतदारांना धक्का दिलाय, तरीही मतदारांनी, शिवसैनिकांनी आजपावेतो संयम राखलाय. पक्षाशी एकनिष्ठ राहिले नसल्याने उबाठाच्या तालुका प्रमुखांनी फारशे गांभीर्याने न घेता सद्यस्थितीत संयमाची भूमिका घेतल्याचे दिसते. पुढे पुढे काय काय घडणार याकडे सर्वांचे लक्ष लागून असणार असल्याचे चित्र दिसते.

# तीन महिन्यापासून निराधारांचे अनुदान रखडले; ठाकरे सेनेचा तहसील कार्यालयाला घेराव

देगलूर/प्रतिनिधी- श्रावणबाळ, वृद्धापकाळ निवृत्ती, अपंग योजना आदी योजनेचे श्रावणबाळ योजनांचे अनुदान गेल्या तीन महिन्यांपासून रखडले आहे. वृद्धांना तात्काळ अनुदान वाटप करावे या मागणीसाठी शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने देगलूर येथील तहसीलदारांना घेराव घालून आंदोलन करण्यात आले.

देगलूर तालुक्यात इंदिरा गांधी योजनांचे व संजय गांधी निराधार योजनाचे १६ हजार २३८ लाभार्थींची संख्या आहे. गेल्या अनुदान तीन महीन्यापासुन शासनाचे पोर्टल बंद असल्याने अनुदान मिळाले नाही. संबंधीत वृद्ध, गोर गरीब लाभार्थ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने सोमवार दि.२२ जून रोजी निराधार योजनेचे नायब तहसीलदार गणेश रायेवार यांना घेराव घालून जाब विचारुन तहसिल कार्यालयाच्या तहसीलदारच्या प्रवेशद्वारावर तीव्र निदर्शने करण्यात आली. व येत्या काही दिवसांत अनुदान न मिळाल्यास तहसील कार्यालयास कुलूप लावून धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, पांडुरंग पाटील थडके देगावकर, भगवान जाधव, विनोद सोनकांबळे, राजेद्र उल्लेवार मुजळगेकर, गंगाधर पाटील चाकूरकर, उपविभाग प्रमुख गंगाधर वक्लवार होट्टलकर, गट प्रमुख सुभाष खुनेवाड माळेगांवकर माजी सरपंच शिंदे आमदापुरकर, संग्राम माधवराव गाडले बल्लूरकर यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.




नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी विजय घोषीत केल्यानंतर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी माजी मंत्री डी.पी.सावंत, महापौर कविता मुळे, संजय कौडगे, किशोर स्वामी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# उबाठा सेनेच्या वतीने बंडखोर ६ खासदारांची काढण्यात आली प्रतिकात्मक अंत्ययात्रा

भोकर/प्रतिनिधी-उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेकडून निवडून येऊन शिवसेना शिंदे गटात सामील झालेल्या त्या ६ खासदारांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा भोकर मध्ये उबाठा शिवसैनिकांच्या वतीने वतीने काढून निषेध करण्यात आला ५० खोके एकदम ओके अशा घोषणाही देण्यात आल्या.

२० जून रोजी सकाळी ११ वाजता किनवट रोड येथून तिरडीवर त्या सहा खासदारांचे फोटो ठेवून चार जणांनी तिरडीला खांदा दिला होता. समोर हातात मडकेही घेण्यात आले होते सर्व विधी पार पाडून ऊबाठा शिवसैनिकांनी निषेध करून गद्दार अशा घोषणा देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत आले. तेथे अंत्ययात्रा संपवून शिवसैनिकांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. आमच्या मतावर निवडून आलेल्या गद्दारांनी पैशाच्या आमिषाला बळी पडून दुसरीकडे प्रवेश केला म्हणून आम्ही ही अंत्ययात्रा काढल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उबाठा सेनेचे जिल्हा उपसंघटक सुभाष नाईक माजी जि. प. सदस्य सुनील चव्हाण, शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार,



दिव्यांग सेनेचे ता.अध्यक्ष विठ्ठल देवड, तालुका संघटक नंदकुमार कवठेकर, शहर संघटक राहुल कुंडलवार, मारुती पवार, साहेबराव भोंबे, गंगाधर महादावाड, रमेश महागावकर, वामन पर्वत, वसंत जाधव, सर्जेराव शिंदे, गोविंद सानमवाड, साया रेडी प्रेमयगार, तानाजी जाधव, नाग भूषण गायकवाड, अजय चव्हाण, अविनाश गमेवाड, कैलास कदम दत्तू पाटील यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# श्रद्धेची श्रीमंती; रेणुकामातेच्या चरणी भक्तांचा कोटींचा वर्षाव

माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूरगड येथील श्री रेणुकादेवी संस्थानच्या दानपेट्यांची मोजणी करण्यात आली असून भाविकांनी केलेल्या देणग्यांमधून संस्थानला एकूण १ कोटी ३५ लाख ९५ हजार २१८ रुपये इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. यासोबतच सोन्या-चांदीचे दागिने व विविध प्रकारचे साहित्यही मोठ्या प्रमाणात अर्पण करण्यात आले आहे.

संस्थानकडून देण्यात आलेल्या अधिकृत माहिती नुसार ८ एप्रिल २०२६ रोजी सीलबंद करण्यात आलेल्या मंदिर परिसरातील एकूण ११ दानपेट्या २० जून रोजी उघडण्यात आल्या. संस्थानचे अध्यक्ष तथा सचिव यांच्या आदेशानुसार तहसीलदार अभिजित जगताप, विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय काण्णव, अरविंद देव, बालाजी जगत, व्यवस्थापक विजय राऊत, लेखापाल योगेश साबळे व सुरक्षा अधिकारी महादेव मुंडे यांच्या



उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.दानपेट्यांमधील रोख रक्कम व मौल्यवान धातूंची मोजणी करून त्याचे मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये ४३ लाख ७३ हजार ७१३ रुपये रोख रक्कम, ९८ ग्रॅम सोने, १३ सोन्याचे नग, तसेच २ किलो ८०१ ग्रॅम चांदी प्राप्त झाली. याशिवाय परशुराम पालखीतील २ किलो २९६ ग्रॅम चांदी देखील जमा झाली आहे.दरम्यान, ९ एप्रिल ते २० जून २०२६ या कालावधीत संस्थानला विविध माध्यमांतूनही मोठ्या प्रमाणात देणग्या प्राप्त झाल्या. देणगी विभागामार्फत ४० लाख ३६ हजार १५३ रुपये, साडी-पातळ विक्रीतून ३० लाख ४० हजार २२२ रुपये, तर ऑनलाइन देणगी स्वरूपात २१ लाख ४५ हजार १३० रुपये जमा झाले. भाविकांनी अर्पण केलेल्या साहित्यामध्ये कटोऱ्या, ताटे, पराती, दिवे, वाट्या, चमचे, करंडे, चाळण्या, सूप, परड्या, फुलदाण्या, टोपल्या आणि लाकडी पादुका अशा एकूण १,०७९ वस्तूंचा समावेश आहे.श्री रेणुकामातेच्या चरणी भाविकांनी अर्पण केलेल्या या विक्रमी देणग्या आणि साहित्यामुळे माहूरगडावरील भक्तीभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, संस्थानच्या धार्मिक व विकासात्मक उपक्रमांना यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

# येवती येथील वीज समस्या सोडवण्याची काँग्रेसची मागणी

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील येवती येथील वाढत्या लोकसंख्येमुळे आणि वाढलेल्या वीज मागणीमुळे येथील ग्रामस्थांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सध्या कार्यरत असलेल्या रोहित्राची क्षमता अपुरी पडत असल्याने नागरिकांना वारंवार वीज खंडित होणे आणि कमी दाबाने वीजपुरवठा होणे यांसारख्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या गंभीर समस्येची दखल घेत युवक काँग्रेसचे कार्यकर्ते तुकाराम पाटील सुडके यांनी खासदार प्रा. रवींद्र वसंतराव पाटील चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना या विषयाबाबत निवेदन सादर केले.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, येवती गावठाण हद्दीतील वाढती वीज मागणी लक्षात घेता, डी.पी.डी.सी. निधीअंतर्गत येथे १०० केव्हीए क्षमतेचे नवीन रोहित्र मंजूर करण्यात यावे. यामुळे गावठाणातील वीजपुरवठा सुरळीत आणि दर्जेदार होण्यास मदत होईल, अशी मागणी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील पाचवे सह दिवाणी न्यायाधिश कनिस्ट स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात

(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)

किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्र.७७८/२०२६

अर्जदार : १.उत्तम पि.जळबा तारु वय : ६३ वर्ष, धंदा-सेवानिवृत्त, २. ज्योती भ्र.प्रदीप तारु (ज्योती पि.रमेश पाटील) वय : २४ वर्ष, धंदा-घरकाम, ३.नितीन पि.उत्तमराव तारु वय : ३६ वर्ष, धंदा-मजुरी सर्व रा.शक्तीनगर, इतवारा ता.जि.नांदेड मो.नं. ९५१८७५१६३३ ई-मेल-नाही

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ आणि ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जदार क्र.१ उत्तम पि.जळबा तारु वय : ६३ वर्ष, धंदा-सेवानिवृत्त, २. ज्योती भ्र.प्रदीप तारु (ज्योती पि. रमेश पाटील) वय : २४ वर्ष, धंदा-घरकाम, ३. नितीन पि.उत्तमराव तारु वय : ३६ वर्ष, धंदा-मजुरी सर्व रा.शक्तीनगर, इतवारा ता.जि.नांदेड यांनी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात नमूद केले आहे की, मयत प्रदीप पि.उत्तमराव तारु यांचा मृत्यू दिनांक ०१.०४.२०२६ रोजी झाला आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे. अर्जदाराने मान्यवर न्यायालयात अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०१/०८/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आक्षेप नोंदवावा मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २० माहे जून २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | ''आदेशावरुन'' |
| **कनिष्ठ लिपीक** | स्वाक्षरित/- |
| ५ वे सह दिवाणी न्यायालय | **स.अधिक्षक** |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्यावरील खोटा गुन्हा रद्द करा;पत्रकार संरक्षण समितीची मागणी

नायगाव/प्रतिनिधी-सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला गुन्हा खोटा असून त्याची निष्पक्ष चौकशी करून तो तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी केली आहे.यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड, उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली तसेच पोलीस निरीक्षक बिलोली यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, लक्ष्मीकांत कलमुर्गे हे अनेक वर्षांपासून सामाजिक व पत्रकारितेच्या माध्यमातून जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत. उपजिल्हा शासकीय रुग्णालय बिलोली येथील आरोग्य सेवा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, पोषण आहार वितरण तसेच विविध शासकीय योजनांतील त्रुटींबाबत त्यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी व निवेदने सादर केली आहेत. याच जनहिताच्या कार्यामुळे काही संबंधित व्यक्तींनी संगनमताने त्यांच्याविरुद्ध खोटे व द्वेषभावनेतून प्रेरित आरोप करून गुन्हा दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांच्या आरोपांची सत्यता सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब तसेच उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पडताळण्यात यावी. चौकशीत आरोप खोटे अथवा दिशाभूल करणारे असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित गुन्हा रद्द करून खोटी तक्रार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण मिळणे ही लोकशाहीची गरज असल्याचे सांगत, या प्रकरणात न्याय्य व निष्पक्ष कारवाई करण्याची मागणी पत्रकार संरक्षण समितीने केली आहे.

पान १ वरुन

## नांदेड विधान परिषद निवडणुकीत...

एमआयएमचा उमेदवार नसतांनाही एमआयएमच्या नगरसेवकांनी मतदान केले आहे. एमआयएमकडे जवळपास २० मते होती. ही मते कोणाला मिळाली याची जोरदार चर्चा राजकीय क्षेत्रात सुरु आहे. तसेच काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचीही मते फुटली आहेत. विजयी उमेदवार अमरनाथ राजूरकर यांना निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी निवडणूक निरिक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांच्यासह मतमोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी निवडणूक राजकुमार माने आदींसह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती. निवडणूक निकाल जाहीर होताच भाजप व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गुलाल व फटाके वाजवून जल्लोष साजरा केला. त्यानंतर नवनिर्वाचित आ.अमरनाथ राजूरकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राणी लक्ष्मीबाई हायस्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

नायगाव/प्रतिनिधी- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी नांदेड दक्षिण व भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा नांदेड दक्षिण यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २१ जून रोजी नरसी येथील राणी लक्ष्मीबाई हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास भाजप महिला मोर्चाच्या नांदेड जिल्हाध्यक्ष अनिताताई गोपछडे, जिल्हा सरचिटणीस माणिक लोहगावे, भगवान पाटील जिगळेकर, श्याम पाटील चोंडे, आकाश पाटील धुपेकर, नागनाथ आप्पा स्वामी महाराज, नरेंद्र हाळे सर, जीवन कोकणे सर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. योग शिबिरात कीर्तनकार ताराबाई बोंबनाळे, योग शिक्षिका दुर्गा सुबनवाड तसेच योग शिक्षिका भालेराव ताई यांनी योग प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले.त्यांनी योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व उपस्थितांना प्रभावीपणे पटवून दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचा सराव करून योगाभ्यासाचा आनंद घेतला.

पान १ वरुन

## बिनशर्त कर्जमाफीसाठी...

आली, असे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.दरम्यान, विधानसभेच्या कामकाजादरम्यान काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचा मुद्दा उपस्थित केला. अल निनोच्या प्रभावामुळे नद्या, नाले, धरणे आणि तलाव कोरडे पडले असून भूजल पातळीही खालावली आहे. अनेक शहरांमध्ये व गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असल्याने या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली.या मागणीवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विषयावर सभागृहात चर्चा घेण्यात येईल, असे स्पष्ट केले.याच दिवशी राज्य सरकारतर्फे सन २०२६-२७ साठी ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर करण्यात आल्या. त्यापैकी शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, या पुरवणी मागण्यांवर २९ व ३० जून रोजी चर्चा व मतदान होणार आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शेतकरी कर्जमाफी, दुष्काळ आणि पाणीटंचाईचे प्रश्न गाजल्याने आगामी कामकाजात या मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळण्याची चिन्हे आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४